Celebrating Cinema
PIFF Pune International Film Festival

# स्वप्न पाहून सत्यात आणण्यासाठी काम करा.

## *बोमन इराणी यांचा अभिनयासाठी सल्ला*

पुणे, दि. १६ फेब्रुवारी २०२५ : उत्तम अभिनेता व्हायचे असेल, तर स्वप्न समोर ठेवा आणि ते साध्य करण्यासाठी काम करा, प्रसिद्धीच्या मागे लागू नका. ती आपोआपच येईल, असा सल्ला आज प्रसिद्ध अभिनेते बोमन इराणी यांनी दिला.

२३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ) मध्ये इराणी विजय तेंडुलकर स्मृती व्याख्यानात अभिनय या विषयावरील कार्यशाळेमध्ये बोलत होते. यावेळी महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल, अभिनेते जितेंद्र जोशी उपस्थित होते.

ते म्हणाले, "कोणतीही गोष्ट एका रात्रीत घडत नसते. माझा दिग्दर्शक म्हणून मेहता बॉईज चित्रपट यायला १२ वर्षे लागली. शेवटी तुम्हाला काय हवे, हे महत्त्वाचे असते. ते तुम्हाला निश्चित करायला हवे. अभिनयाचेही असेच आहे. उत्तम अभिनय करण्यासाठी सतत काम करावे लागेल. ज्या चित्रपट अथवा नाटकात काम करायचे असेल, त्यांच्या पटकथेवर लक्ष द्या. अभिनय आणि पटकथा एकमेकांशी जोडलेल्या असतात. त्यामुळे अभिनय करताना केवळ तुमचा संवाद ज्याला गोल्डन वर्ड म्हणतात तो काय आहे, किंवा तुम्ही काय अभिनय करायचा आहे, यावर लक्ष देताना संपूर्ण पटकथा काय आहे, त्याच्या पुढे आणि मागे काय घडते, यावर लक्ष द्या. पटकथा लिहिण्याची प्रक्रिया काय असते, हेही समजून घ्यायला हवे. चित्रपट हे केवळ घटना नसतात तर ते माणसांची गोष्ट सांगत असतात. त्यामुळे उत्तम माणूस होणे, हेही गरजेचे आहे."

त्यांनी पटकथा कशी असावी, याविषयीही यावेळी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, पटकथेमध्ये पहिल्या ७ ते ८ मिनिटात काहीतरी वेगळे घडायला हवे. पुढे २५

मिनिटात मध्यवर्ती भूमिकेत असणाऱ्या व्यक्तिरेखेचा प्रवास सुरू होतो. मध्यानंतर मध्यवर्ती व्यक्तिरेखेने ननायकास अथवा परिस्थितीस आव्हान द्यायला हवे. पुढच्या भागामध्ये नायक अथवा मध्यवर्ती भूमिकेतून व्यक्ती ही संघर्ष गमावून बसते. पुढे ते नव्याने सुरुवात करतात. ज्याला डार्क नाईट ऑफ द सोल, असे म्हणतात. आणि शेवटी मध्यवर्ती भूमिकेतून व्यक्ती आपले ध्येय साध्य करते, या क्रमाने पटकथा जायला हवी. दिग्दर्शक व्हायचे असेल, तरीही पटकथा कशी लिहिली जाते, हे शिकायला हवे. ते म्हणाले, “उगाच बजेटबद्दल बोलू नका. चित्रपट तयार करताना तुमच्याकडे जे आहे, त्यात काय करता येईल, याचा विचार करा.”

आपली आयुष्याची कथा सांगताना ते म्हणाले, “मला बोलण्यामध्ये अडचण यायची त्यामुळे लोक हसायचे मग माझे बोलणेच बंद झाले. मी बोलायचो नाही. एकदा शाळेच्या कार्यक्रमात मला हसताना आईने पाहिले आणि तिला कळले की मी स्टेजवर आनंदी आहे. मग तिने मला गाण्याच्या क्लासला घातले आणि चित्रपट पाहायला पाठवले. मी एक तर चित्रपट ३६ वेळा पाहिला. आमचे वेफर्स विकण्याचे दुकान होते. नॉव्हेल्टी सिनेमा आमच्या दुकानाजवळ होते. तिथे मी सतत जायचे. एकदा माझ्या अंध असणाऱ्या काकांना चित्रपटगृहात घेऊन गेलो आणि एल्डी चित्रपटाची कथा ऐकवली. त्यानंतर आईने मला आत्मविश्वास दिला आणि मी अभिनयाकडे वळलो.”

इराणी यांनी १४ वर्षे दुकानात काम केले. नंतर त्यांनी फोटोग्राफी केली आणि मग ते नाटकाकडे वळले. त्यांनी सुधीर जोशी यांना घेऊन ‘आय एम नॉट बाजीराव’ हे प्रायोगिक नाटक पहिल्यांदा केले. ते नाटक १० वर्षे केले. महात्मा विरुद्ध गांधी हे इंग्रजी नाटक केले.  ते म्हणाले, “मला सुधीर जोशी यांनी सांगितले, की तू जी भूमिका करशील त्यावर विश्वास ठेव आणि त्याच भूमिकेत जग. ते नाटक आणि ‘लेट्स टॉक’ बघून  मात्र तो प्रदर्शित झाला नाही. विधू विनोद चोप्रा यांनी मात्र तो पाहिला आणि पुढे मुन्नाभाई मध्ये घेतल्याचे त्यांनी सांगितले.

जितेंद्र जोशी यांनी व्हेंटिलेटर या चित्रपटाच्या वेळच्या इराणी यांच्या आणि त्यांच्या आईच्या आठवणी सांगितल्या.

कार्यशाळेपूर्वी माध्यमांशी बोलताना इराणी म्हणाले, "मी गोविंद निहलानी, श्याम बेनेगल, जब्बार पटेल, विजय तेंडुलकर यांना पाहत घडलो आहे. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊनच पुढे नाटकात आलो. " ते पुढे म्हणाले, की पिफ या महोत्सवामध्ये चित्रपटकर्ते आणि प्रेक्षकांमध्ये थेट संवाद होतो, विचारांची देवाणघेवाण होते. हे महत्त्वाचे आहे. या महोत्सवामध्ये मोठ्या प्रमाणावर तरुण आहेत, त्यांना जागतिक सिनेमाची दृष्टी मिळते, हे या महोत्सवाचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी सांगितले.